# Washim District Police

**Nature of work** :- Solving Sensational Crime

**Police Station** :- PS Jaulka / Local Crime Branch

**Date of Good Work Done** :- 25/09/2017

## Brief of the work done :-

An Unidentified dead body was foud at lake near Village Mairaldoh, Tq. Malegaon, Panchanama was made by PS Jaulka. PS Jaulka was trying to solve this case but they found nothing. then the case handed over to Local Crime Branch, Washim and they investigate all tha aspects in this case and also taking help of Cyber expert to solve this case and hence it is clear that the Accuse named Subhash Tagad (50 yrs.) and Kailas Pralhad Gangawane (Live at Depul, Tq. Washim) both had killed that Woman Named Rahibai Tryambak Ghuge (45yrs. live at Gavha, Dist. Parbhani). Mentioned accuse Subhash Tagad had illegal physical relation with this lady and this relation should not be opened in the public for this reason accompany with Kailas Gangwane at dated. 28 Dec 2016 while taking her on motor cycle towards Depul, press her throat and murdered her and threw her body into the Sonala lake and also stolen golden ornament of about 76000/- Rs. was also recovered from them.

This investigation is carried out under the guidance of Hon'be SP Mokshada Patil madam and Addl. SP Swapna Gore team led by LCB PI Dukare Patil after continuously searching them and taking help of Cyber experts of washim police. The team includes API Salve, PSI Ingle, HC Pradip Chavan, Sunil Chavan, Raju Rathod, Ravi Gharat, Balaji Barve, Ramkrushna Nagare.

**Image**:

## अनैतिक संबंध दडवण्यासाठीच महिलेची हत्या!

- आरोपींची कबुली
- सोनाळा धरणातील प्रेत प्रकरण
- ९ महिन्यांनी छडा
- स्थागुशा पथकाचे यश



*प्रतिनिधी* /२५ सप्टेंबर

**वाशिम :** मृतक महिलेसोबत असलेल्या अनैतिक संबंधांचा गवगवा होवू नये याकरीता गळा आवळून तिची हत्या केली, अशी कबुली या प्रकरणातील मुख्य आरोपीसह त्याच्या अन्य एका साथीदाराने स्थानिक गुन्हे शाखा पथकास दिली. २८ डिसेंबर २०१६ रोजी सदर महिलेची हत्या करुन आरोपींनी मृतदेह सोनाळा धरणात टाकून दिला होता. तब्बल ९ महिन्यानंतर स्थागुशा पथकाने अखेर या हत्याकांडाचा छडा लावला.

याबाबत पोलिस सुत्रांकडून प्राप्त माहितीनुसार देपूळ ता. वाशिम येथील आरोपी सुभाष तागड (वय ५०) याचे परभणी जिल्ह्यातील गव्हा येथील ४५ वर्षीय महिलेसाबत अनैतिक संबंध होते. या संबंधाचा गवगवा होवू नये, याकरीता सुभाष तागड याने गावातीलच कैलास प्रल्हाद गंगावणे (वय ३०) याच्या मदतीने २८ डिसेंबर २०१६ रोजी त्या महिलेस मोटारसायकलने देपूळ येथून जऊळका रेल्वे पोलिस स्टेशनच्या हद्दीतील मैराळडोह नजिकच्या सोनाळा धरणाजवळ आणले. तेथे तिचा गळा आवळून नंतर प्रेत दगडाने बांधून सोनाळा धरणात टाकून दिले, अशी कबुली मारेकऱ्यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास दिली. सुरुवातीस आरोपी खोटे बोलत होते. मात्र स्थागुशा पथकाने मिळालेले डिजीटल पुरावे, गुप्त माहितीच्या आधारे अनुभव व तपास कौशल्य पणास लावून अखेर आरोपींना बोलते केले.

अन्वेषणादरम्यान आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून मृतकाच्या अंगावरील काढलेले ७६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागीणेही जप्त करण्यात आले आहेत. दरम्यान, १६ जानेवारी २०१७ रोजी मृतदेहाची उत्तरीय तपासणी व प्राथ. चौकशीनंतर जऊळका रेल्वे पोलिस स्टेशनमध्ये अप क्र. ११/२०१७ कलम ३०२, २०१ भांदविनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अत्यंत आव्हानात्मक तेवढ्याच बहुचर्चित या प्रकरणाचा छडा जिल्हा पोलिस अधिक्षक मोक्षदा पाटील, अप्पर पोलिस अधिक्षक स्वप्ना गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक प्रकाश डुकरे पाटील यांचेसह सपोनि किरण साळवे, अजय वाढवे, पोउपनि कैलास इंगळे यांच्या पथकातील पोहेकॉ प्रदिप चव्हाण, नापोकॉ सुनिल चव्हाण, पोकॉ रवि घरत, राजु राठोड, बालाजी बर्वे, रामकृष्ण नागरे यांनी अथक परिश्रम घेवून लावला. या प्रकरणी पुढील तपास सपोनि आर.जी. शेख हे करीत आहेत.

ePaper देशोन्नती Tue, 26 September 2017
deshonnati.digitaledition.in//c/22454148